# SNBP's International School, Manjri

**Subject: MARATHI - Class: VIII** **Dated: 29-04-2020**

## ( अपठित उतारा )

प्र. १.खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

परीक्षा ही जशी ज्ञानाची चाचणी असते, तशीच व्यक्तिमत्त्वाची छाननी पण असते. परीक्षेच्या कसोटीवर व्यक्तिमत्त्व घासले जाते आणि त्यातला दुबळेपणा उघडकीला येतो. यश आणि अपयश सापेक्ष असतात. त्यामुळे कोणत्याही परीक्षेला बसण्यापूर्वी आपली यशाची व्याख्या काय, याचा आढावा पालक आणि पाल्य यांनी एकत्र बसून घेतला पाहिजे. पाल्याची आवड व कुवत पाहून हा निर्णय अवलंबून ठेवला पाहिजे. नुसतं मेडिकलला प्रवेश मिळवणे, असं एकच एक ध्येय ठेवणे धोकादायक असू शकते. समजा एखाद्या विद्यार्थ्याने जिवावर उदार होऊन असा कुवतीबाहेरचा ताण घेऊन प्रवेश मिळवलाच तरी पुढे सतत कुवतीपेक्षा जास्त ताणाचे ओझे किंवा आवड नसलेल्या करिअरचे जोखड जन्मभर वागवावे लागेल. मग व्यक्तिमत्त्वावर सतत ताण देऊन, गटांगळ्या खात खोल, अति कष्टाने जीवन जगण्यात कसला आला आहे आनंद?

रोजचे जीवन हे 'बिकट वाट वहिवाट' म्हणून स्वीकारले तर कुठले आले आहे सुख? असले शिवधनुष्य उचलून छाताडावर पाडून घेण्यापेक्षा सहजसाध्य, रुचिसाध्य क्षेत्र निवडावे त्यातच निरामय, आरामदायी, सुखी जीवन असू शकेल. ज्याची बारा फूट लांब उडी मारण्याची क्षमता आहे, त्याला सोळा फुटांच्या मागे लावून देऊन त्याच्या जीवनाची होरपळ होण्याचा संभव जास्त आणि सोळा फूट उडी मारता न आल्यास 'अपयश' मानणे ही आत्मवंचना होय!

थोडक्यात, सुखाची व्याख्या ज्याची त्याने ठरवावी आणि तसे मार्गक्रमण करावे. बुद्धिमत्ता ही आकाशस्थ देणगी असते. पण हिरा जसा कोंदणातच खुलून दिसतो त्याप्रमाणे बुद्धिच्या तेजाला व्यक्तिमत्त्वाच्या जोड गुणांचे कोंदण लागते. आपण त्याचे मानसिक जोडगुण मात्र प्रयत्नांनी वाढवू शकतो. बुद्धी वाढवता आली नाही, तरी तिचा वापर आपण वाढवू शकतो.

**प्रश्न** –

(i) परीक्षेचे महत्त्व काय आहे?

(ii) कुवतीबाहेरचे निर्णय धोकादायक कसे ठरतात?

(iii) माणसाची आत्मवंचना केव्हा होते?

(iv) आपण बुद्धिचा वापर कसा वाढवू शकतो?

(v) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या व त्याची संपर्कता स्पष्ट करा.

प्र.२ कविता वाचून प्रश्नाची उत्तरे लिहा.

नदी बाई माय माझी
डोंगरात घर
लेकरांच्या मायेपोटी
येते भूमीवर ।।

नदीमय जल साऱ्या
तान्हेलेल्यांना देई
कोणी असो ,कसा असो
भेदभाव नाही
शेतमळे मायेमुळे
येती बहरात ।।

पुढच्यांच्या थव्यांसाठी
जाई दूर दुर
माय सांगे , थांबू नका
पुढे पुढे चला
थांबल्याचा पराजय
जय चालत्याला ।।

१. नदीचे घर कोठे आहे ?

२. नदी माय कोणाच्या मायेपोटी भूमीवर येते ?

३. नदी कोणता भेदभाव करत नाही ?

४. नदी काय सांगत आहे ?

५. कोणत्याही नदीचे ४/५ ओळीत वर्णन करा .

प्र. ३. माझे कुटुंब या विषयावर ५ ते ६ ओळी लिहा.

प्र. ४. तुमच्या आवडते शिक्षक यावर ७/८ ओळी लिहा.

प्र ५.खालील वाक्यातील सर्वनामे अधोरेखित करा.

१. मी कुमारला हाक मारली.

२.मी त्यांना सुविचार सांगितला.

३.तुला नविन दप्तर आणले.

४.त्याने घर झाडून घेतले.

५.त्याचा फोटो छान येतो.

६.आपण पतंग उडवुया.

प्र.६.खालील वाक्यातील रिकाम्या जागी कंसातील योग्य सर्वनामे लिहा.

( आम्ही ,तुम्ही, तिचा, तो , तिने ,आमचे )

१. _______ गावाला जा.

२.आईने ________ डबा भरुन दिला.

३.आज ________ खूप मजा केली.

४.दादा धावपटू आहे. _____ रोज पळतो.

५.________ बाळाला मांडीवर घेतले.

६.मोत्याने धावत येऊन ________स्वागत केले.

प्र७.काळाचे मुख्य प्रकार किती आहेत ?त्यांची नावे लिहा.

प्र.८. वचन बदला.

१.आठवण

२.नोट

३.दरवाजा

४.वाटा

५.पडदा

प्र.९. विरुद्धार्थी शब्द लिहा.

१.सुदैव

२.चोर

३.पौर्णिमा

४.मुलगा

५.लवकर

प्र. १०. समानार्थी शब्द लिहा.

१. नदी

२. गाणे

३. सूर्य

४.ढग

५.पंडित

प्र.११. लिंग ओळखा .

१.आकृती

२.डाळिंब

३.पाणी

४.घडयाळ

५.रंग

प्र.१२.शब्द समूहाबद्दल एक शब्द लिहा.

१.मूर्ती बनवणारा

२.भाषण देणारा

३.चित्रे काढणारा

४.गाणे गाणारा

५.कथा लिहीणारा

प्र.१३. पत्रलेखन .

आपल्या मित्राला तुमच्या गावातील यात्रेचे निमंत्रण देणारे पत्र लिहा.

प्र.१४. खालील चित्र पाहुन १०/१२ वाक्य लिहा.

शाळेत क्रीडा दिवस

